# मिरा भाईंदर महानगरपालिका

उपायुक्त (II) यांचे कार्यालय,
ई-मेल : dmc2@mbmc.gov.in
जा.क्र.मनपा/उपायुक्त/127/२०२५-२६
दि. 04 /07/२०२५

**परिपत्रक**

मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये विभागामार्फत विविध विकास कामांच्या तसेच खरेदीच्या व इतर निविदा विभाग स्तरावर तांत्रिक तपासणी करुन अंतिम छाननीसाठी निविदा समितीकडे सादर केल्या जातात. निविदा समितीच्या असे निदर्शनास आले आहे की काही निविदाकार निविदेसोबत खोटी कागदपत्रे (forged documents) जोडुन निविदा सादर करीत आहेत.

शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.सीएटी/2018/प्र.क्र.127/इमा-2, दि.28 नोव्हेंबर 2018 मध्ये निविदाकाराला सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र 500 रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर लिफाफा क्र.1 मध्ये जोडणे बंधनकारक करण्यात आले आलेले आहे. यासाठी पुर्णपणे कंत्राटदार जबाबदार असेल असे नमुद आहे. शासन निर्णयात जरी असे नमुद असले व निविदाकाराने रु.500/-च्या स्टॅम्प पेपर व खरेपणाबाबत प्रतिज्ञापत्र दिले तरी भविष्यात महानगरपालिकेच्या कामामध्ये व्यत्यय येवू नये म्हणुन सर्व विभागांना व विभागप्रमुखांना सुचित करण्यात येते की, त्यांनी विभागस्तरावर सर्व कागदपत्रांची सत्यता पडताळणी करावी. व काही कागदपत्रांमध्ये शंका असल्यास अशी कागदपत्रे ज्या शासकीय/निमशासकीय किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेने दिलेले असेल त्या संस्थेला सदरची कागदपत्रे पाठवुन सत्यतेबाबत खात्री करावी व त्यानंतरच प्रस्ताव निविदा समितीकडे तांत्रिक छाननीसाठी सादर करावा.

(डॉ. सचिन बांगर)
प्र. अतिरिक्त आयुक्त तथा
निविदा समिती अध्यक्ष
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,

1. सर्व उपायुक्त,
2. शहर अभियंता,
3. सर्व विभागप्रमुख/खातेप्रमुख.

प्रत माहितीस्तव:-
मा.आयुक्त महोदय.